नि.फौ.प्र.क्र.११०/२०१९
निशाणी क्रमांक – २०

| | |
|---|---|
| MHCH170009282019 | दाखल तारीख : २९/०९/२०१९<br>नोंदणी तारीख :२९/०९/२०१९<br>निकाल तारीख :०१/०६/२०२६<br>कालावधी :०६ वर्षे ०८ महिने ०३ दिवस |

# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर यांचे न्यायालयात

**( पिठासीन अधिकारी – श्री. आर. डी. भुयारकर )**

**नि.फौ.प्र.क्र. ११०/२०१९**

**निशाणी क्रमांक – २०**

प्रथम खबरी अहवालाची माहिती
गुन्हा क्र. :२५९/१९
पोलिस स्टेशन : पोलिस स्टेशन, चिमूर.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासना तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,<br>पोलिस स्टेशन, चिमूर,<br>ता. चिमूर, जि. चंद्रपूर. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती पी. व्ही. गंधारे. |
| आरोपी | विकास विठोबा घरत,<br>वय: ४६, धंदा: मजुरी,<br>रा. बोरगाव बुटी,<br>ता. चिमूर, जि. चंद्रपुर. |
| आरोपीकरिता वकील | श्री. एस. टी. नन्नावरे. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.३०/०६/२०१९ |
| प्रथम खबर दिल्याची तारीख | दि.०१/०७/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | दि.२९/०९/२०१९ |
| दोषारोप नोंदवल्याची तारीख | दि.२३/०१/२०२० |

नि.फौ.प्र.क्र.११०/२०१९
निशाणी क्रमांक – २०

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविल्याची तारीख | दि.३०/०१/२०२० ते १३/०४/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | दि.०१/०६/२०२६ |
| निकालाची तारीख | दि.०१/०६/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | – |

आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | कलम | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठावली | खटल्याच्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विकास विठोबा घरत | ०२/०८/२०१९ | ०२/०८/२०१९ | भा.दं.वि. चे कलम ४५७ व ३८० | निर्दोष | – | – |

अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सुनिल राजाराम लांबट | घटनास्थळ पंच |
| २. | राहुल नथ्थुजी चौधरी | फिर्यादी |

बचाव साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

नि.फौ.प्र.क्र.११०/२०१९
निशाणी क्रमांक – २०

**न्यायनिर्णय**

(पारीत दिनांक:०१/०६/२०२६)

आरोपीविरूध्द सदरील खटला भारतीय दंड विधानच्या (थोडक्यात ''भा.द.वि.'') कलम ४५७ व ३८० अन्वयेच्या शिक्षा पात्र असलेल्या गुन्हयासाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात येणे प्रमाणे** :

२. दिनांक ३०/०६/२०१९ रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे दुकानाचे शटरच्या वर असलेल्या जागेमधुन आत प्रवेश करुन दुकानातील काउंटरचे लॉक तोडुन लॉकर मध्ये असलेले ३४,०००/– रु चोरुन नेले. म्हणून फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, चिमूर यांनी अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा क्र. २५९/१९ नोंदविला.

३. तपासादरम्यान तपासी अधिका–यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदाराचे बयाण नोंदविले आणि आरोपीला अटक करून प्रकरणात आवश्यक तो पुरावा हस्तगत करून त्याच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. सदर प्रकरणामध्ये माझ्या पुर्व पिठासीन अधिका–यांनी आरोपीविरूध्द दोषारोप (नि.क्र.०४) ठेवले. आरोपीने त्यामध्ये गुन्हा कबूल नसल्याचे (नि.क्र.०५)

सांगुन प्रकरणाला समोर जाण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा दर्शक पुरावा न आल्याने आरोपीचे कलम ३१३ फौ.प्र.सं. अन्वयेचे निवेदन विसर्जीत करण्यात आले.

५. विद्वान सहायक सरकारी वकील – श्रीमती पी. व्ही. गंधारे व आरोपीचे विद्वान वकील श्री. एस. टी. नन्नावरे यांचा युक्तीवाद ऐकला. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहेत:

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, प्रस्तुत घटनेच्या वेळी आरोपीने फिर्यादीचे दुकानातुन रक्कम रु. ३४,०००/– चोरुन नेले? | **नाही** |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, प्रस्तुत घटनेच्या वेळी आरोपीने रात्रीच्या वेळी चोरी करण्याच्या हेतुने फिर्यादीच्या दुकानात घरफोडी केली? | **नाही** |
| ३ | कुठला गुन्हा शाबीत झाला काय? | **नाही** |
| ४ | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आपली बाजू सिध्द करण्याकरिता एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यामध्ये घटनास्थळ पंच – सुनिल राजाराम लांबट

(सा.क्र.०१) यांची साक्ष नि.क्र.०७ वर व फिर्यादीची साक्ष नि.क्र.१६ वर नोंदविली आहे. या व्यतिरिक्त अभियोगपक्षाने इतर अन्य साक्षीदार तपासले नाहीत. आरोपीने त्याच्या बचावामध्ये कुठलाही पुरावा दिला नाही.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३:</u>**

७. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते एकाच वेळी चर्चेकरिता घेण्यात आले.

८. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने त्याच्या बाजुला बळकटी येण्याकरिता फिर्यादीची साक्ष नोंदविली. फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये दुकानामधुन रु.३४,०००/– चोरी गेल्याचे सांगीतले. फिर्यादीने तक्रार (नि.क्र.१७) व छापील प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१८) वर त्यांची सही असल्याचे सांगुन मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. फिर्यादीने त्यांच्या पुराव्यामध्ये कथन केले आहे की, त्यांना प्रस्तुतचे प्रकरण चालवायचे नाही. फिर्यादीने आरोपीविरुद्ध साक्ष न दिल्यामुळे फिर्यादीची साक्ष अभियोगपक्षाला आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता तिळमात्रही उपयुक्त नाही.

९. घटनास्थळ सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच – सुनिल (सा.क्र.०१) याची साक्ष नोंदविली. त्याच्या साक्षीमध्ये त्याने कथन केले की, पोलीसांनी त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनाम्याची कार्यवाही केली होती. त्याने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.०८) मधील मजकुर बरोबर असल्याचे सांगीतले.

आरोपीच्या वतीने घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये काहीही विपरीत आलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारामार्फत अभियोगपक्षाने घटनास्थळ सिध्द केले असे मी ग्राहय धरतो.

१०. कायद्याच्या प्रचलित तत्वांनुसार अभियोग पक्षाला आरोपीचा गुन्हा सर्व शंकेपलीकडे सिध्द करणे क्रमप्राप्त होते. परंतु सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यातुन कुठलीही जप्ती सिध्द केलेली नाही. त्याचप्रकारे फिर्यादीने पुरसीस (नि.क्र.१५) अन्वये त्यांना सदरचे प्रकरण चालवायचे नाही असे कळविले. वरील सर्व बाबी विचारात घेता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे आरोपी हा निर्दोष सुटका होण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.०४:**

११. वरील चर्चेप्रमाणे व वरील मुद्यांच्या निष्कर्षावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी – विकास विठोबा घरत यांची कलम ४५७ व ३८० भा.द.वि. च्या गुन्हयातुन कलम २४८ (१) फौ.प्र.सं. अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. या प्रकरणामध्ये आरोपीने दिलेली पुर्वीची जमानत पुढील सहा महिण्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल व त्या जमानतीला कलम ४३७–अ

फौ.प्र.सं. अन्वये जमानत म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

३. सदर खटल्यातील जप्त रक्कम रु. ४,०००/– आवाहन कालावधीनंतर फिर्यादीला परत देण्यात द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व टंकलिखीत)

RUSHIKESH DILIP BHUYARKAR

Digitally signed by RUSHIKESH DILIP BHUYARKAR
Date: 2026.06.01 17:00:37 +0530

दिनांक :०१/०६/२०२६ (श्री. आर. डी. भुयारकर)

ठिकाण – चिमूर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर.

नि.फौ.प्र.क्र.११०/२०१९
निशाणी क्रमांक – २०

**–: प्र मा ण प त्र :–**

सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजुकरातील शब्द न् शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एम. एस. परदेशी |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर, ता.चिमूर, जि. चंद्रपूर. |
| मा. साहेबांनी चेक केले व पी.डी.एफ. दिनांक | : | ०१/०६/२०२६. |

सही/–
लघुलेखकाची सही